आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
४ डिसेंबर २०२५ - गुरूवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतीन नवी दिल्लीत दाखल, भारत आणि रशियाच्या विविध मंत्र्यांमध्ये शिष्टमंडळस्तरीय चर्चा

- तंबाखू आणि तत्सम वस्तूंवर अतिरीक्त उत्पादन शुल्क लादणाऱ्या विधेयकाला संसदेची मंजुरी

- इंडिगो कंपनीची सुमारे ३०० विमानं रद्द झाल्याचं प्रवाशांची मोठी गैरसोय

आणि

- रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीच्या द्वैमासिक बैठकीतले निर्णय उद्या जाहीर होणार

**<><><><><>**

तेविसाव्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन थोड्याच वेळापूर्वी नवी दिल्लीत पोहोचले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विमानतळावर त्यांचं स्वागत केलं. त्यापूर्वी दोन्ही देशांच्या विविध मंत्र्यांमध्ये आज नवी दिल्लीत शिष्टमंडळ स्तरावर चर्चा झाली. याविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - होल्ड व्हाइस कास्ट - -**

*(रशिया हा भारताचा काळाच्या कसोटीवर सिद्ध झालेला खास आणि धोरणात्मक भागिदार असून, जागतिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवरही दोन्ही देशांमधले संबंध सातत्यानं दृढ होत आहेत, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत लष्कर आणि लष्करी तांत्रिक सहकार्यविषयक भारत-रशिया आंतर सरकारी आयोगाच्या मंत्रालयस्तरीय बैठकीत बोलत होते. राजनाथ सिंग आणि रशियाचे संरक्षण मंत्री आंद्रेई बेलॉसोव्ह यांनी संयुक्तरित्या या बैठकीचं अध्यक्षस्थान भूषवलं. रशियाच्या नेतृत्वाखालच्या युरेशियन आर्थिक संघाबरोबर मुक्त व्यापार करारासाठी चर्चेच्या प्रारंभाचं भारत स्वागत करत आहे, असं त्यांनी सांगितलं.*

*दोन्ही देशांमधल्या परस्पर संबंधांना एक धोरणात्मक पदर असून, दक्षिण आशिया आणि जागतिक सुरक्षेचा समतोल साधण्यात भारताबरोबरची भागिदारी हा अत्यंत महत्वाचा घटक असल्याचं रशियाचे संरक्षण मंत्री आंद्रेई बेलॉसोव्ह यांनी यावेळी सांगितलं. संरक्षण दल प्रमुखांसह तिन्ही सैन्य दलांचे प्रमुख याबैठकीला उपस्थित होते.*

*केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज रशियाचे उपप्रधानमंत्री डेनिस मंतुरोव्ह यांच्या नेतृत्वाखालच्या रशियन शिष्टमंडळाची भेट घेतली. यावेळी गुंतवणूक, बँकिंग, वित्त, इत्यादी महत्वाच्या मुद्यांवर चर्चा झाली.*

*नवी दिल्लीत आज भारत-रशिया व्यापार मंचाला वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल संबोधित केलं. भारत हा जगासाठी एक विश्वासार्ह, आणि भविष्याकडे पाहणारा भागिदार असून, व्यापार वाढवण्यासाठी, तसंच आर्थिक भागिदारी वाढवण्यासाठी योग्य स्थिती निर्माण करत आहे, असं ते यावेळी म्हणाले. केंद्रिय आरोग्यमंत्री जे पी नड्डा यांनी आज रशियाचे आरोग्यमंत्री मिखाईल मुराश्को यांची भेट घेतली.*

*दरम्यान, पुतिन यांच्या भारत भेटीच्या पार्श्वभूमीवर, भारतानं २ अब्ज डॉलर्सचा रशिया पाणबुडी करार केला आहे, असा दावा करणारं सोशल मीडियावरच्या वृत्ताचं केंद्र सरकारनं खंडन केले आहे. प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोच्या फॅक्ट चेक युनिटने माहिती दिली आहे. मार्च २०१९ मध्ये झालेल्या जुन्या करारावर आधारित हा करार आहे.)*

**<><><><><>**

केंद्रीय उत्पादन शुल्क सुधारणा विधेयकाला आज संसदेची मंजुरी मिळाली. यामुळं तंबाखू आणि तंबाखू जन्य पदार्थांवर जीएसटी अधिभार रद्द झाल्यावर अतिरीक्त उत्पादन शुल्क लादण्याचा मार्ग मोकळा होईल.

सिगारेटवर अतिरीक्त शुल्क लादल्यानंतर मिळणारा अतिरीक्त महसूल वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार राज्यांनाही दिला जाईल असं आश्वासन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी राज्यसभेत या विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना दिलं. अधिकाधिक शेतकऱ्यांनी तंबाखू ऐवजी इतर पीकांची लागवड करावी यासाठी सरकारनं विविध योजना आणल्या आहेत. यामुळं महाराष्ट्रासह विविध राज्यातल्या शेतकऱ्यांनी १ लाख हेक्टरहून अधिक जागेवर इतर पीकं लावायला सुरुवात केल्याचं त्या म्हणाल्या.

लोकसभेत आज आरोग्य आणि राष्ट्रीय सुरक्षा अधिभार विधेयकावर चर्चा झाली. पानमसाला आणि इतर जीवनावश्यक वस्तूंवर हा अधिभार लावण्याचा सरकारचा विचार आहे. यातून येणारा महसूल आरोग्य योजनांवर खर्च करण्यासाठी राज्यांनाही दिला जाईल.

<><><><><>

देशातल्या महामार्गांवर सध्या टोल घेण्यासाठी असलेली व्यवस्था येत्या वर्षभरात बंद करुन, त्याऐवजी विना अडसर इलेक्ट्रॉनिक प्रणाली बसवली जाईल, असं केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नीतीन गडकरी यांनी आज लोकसभेत सांगितलं. ही नवी प्रणाली सध्या १० ठिकाणी सुरु केली आहे. वर्षभरात ती देशभर सुरु केली जाईल, मग टोल देण्यासाठी वाहनांना थांबावं लागणार नाही, असं ते म्हणाले.

<><><><><>

मेरा गाव - मेरी धरोहर कार्यक्रमात अधिकृत पोर्टलवर आतापर्यंत  ६ लाख २३ हजार गावांची सांस्कृतिक नोंदणी झाली आहे, अशी माहिती केंद्रीय संस्कृती आणि पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी राज्यसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात दिली. या कार्यक्रमात देशभरातल्या ६ लाख ३८ हजारांहून अधिक गावांची सांस्कृतिक नोंदणी केली जाणार आहे, असंही ते म्हणाले. या गावांमधल्या मौखिक परंपरा, वारसा स्थळं, अन्न संस्कृती, ऐतिहासिक माहिती, परंपरा, चाली - रीती अशी विविध माहिती संकलित केली जात आहे, असं त्यांनी सांगितलं. या कार्यक्रमामुळे ग्रामीण ओळख बळकट होण्यास मदत मिळणार आहे.

<><><><><>

एक देश एक निवडणूक संदर्भातल्या संयुक्त संसदीय समितीची बैठक आज नवी दिल्लीत झाले. समितीचे अध्यक्ष पी पी चौधरी यावेळी उपस्थित होते. सर्व घटकांचा विचार करूनच समिती आपल्या शिफारसी सादर करेल असं, चौधरी यावेळी म्हणाले.

<><><><><>

केंद्रीय महिला आणि बाल विकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत बाल विवाह मुक्त भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी १०० दिवसांच्या जागरूकता अभियानाचं उद्घाटन झालं. सरकारनं भारताला २०३० पर्यंत बाल विवाह मुक्त करण्याचं

लक्ष्य निर्धारित केलं आहे, असं अन्नपूर्णा देवी यांनी सांगितलं. नागरिकांच्या सक्रिय सहभागातूनच हे लक्ष्य साध्य करता येईल, असं त्या म्हणाल्या.

<><><><><>

छत्तीसगडमध्ये बिजापूर जिल्ह्यात काल झालेल्या चकमकीत मारले गेलेल्या माओवाद्यांची संख्या १८ वर पोहोचली आहे. त्यात ९ महिलांचा समावेश आहे. चकमकीच्या ठिकाणाहून एक एलएमजी, एके ४७ रायफल, एसएलआर, इन्सास रायफल, 303 बोअर गन, एक रॉकेट लॉन्चर, तसंच बॉम्बगोळे, रेडिओ संच, स्कॅनर्स, माओवादी साहित्य आणि मोठ्या प्रमाणात स्फोटक साहित्य, सुरक्षा दलांनी जप्त केलं आहे.

या चकमकीत शहीद झालेल्या तीन सुरक्षा जवानांना आज बिजापूरमधल्या नव्या पोलीस वसाहतीत आदरांजली वाहण्यात आली. जखमी झालेल्या दोन जवानांना रायपूरमधल्या रूग्णालयात उपचार सुरू आहेत.

<><><><><>

इंडिगो कंपनीची सुमारे ३०० विमान उड्डाणं आज रद्द झाली आणि इतर अनेक विमानं विलंबानं उड्डाण करत आहेत. काल कंपनीची २० टक्क्यांहून कमी विमान वेळेवर उडाली होती. परिस्थिती नियमित करण्यासाठी आणि उड्डाण वेळेत करण्याचं कठीण उद्दिष्ठ गाठण्यासाठी प्रयत्नशील असल्याचं कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर एल्बर यांनी कळवलं आहे.

<><><><><>

एअर इंडियाच्या विमानप्रवासादरम्यान आपल्या सतारीचं मोठं नुकसान झाल्याची तक्रार आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सतार वादक अनुष्का शंकर यांनी समाजमाध्यमावर केली आहे. एअर इंडियामध्ये भारतीय वाद्यही सुरक्षित नसून गेल्या पंधरा ते सतरा वर्षात असा प्रकार कधीही घडला नव्हता. असं त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. आपल्या सतारीला गेलेल्या तड्यांचा व्हिडीओही त्यांनी पोस्ट केला आहे. दरम्यान या घटनेची सखोल चौकशी सुरु करण्यात आल्याचं एअर इंडियाच्या प्रवक्त्यानं म्हटलं आहे.

<><><><><>

रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण आढावा समितीच्या द्वैमासिक बैठकीत झालेले निर्णय गव्हर्नर संजय मल्होत्रा उद्या सकाळी १० वाजता जाहीर करतील. कालपासून ही बैठक

मुंबईत सुरू आहे. यावेळी व्याजदर पाव टक्क्यानं कमी होतात की सलग तिसऱ्यांदा जैसे थे राहतात याविषयी अर्थतज्ज्ञांमध्ये मतमतांतरं आहेत.

<><><><><>

राज्य बार कौन्सिलच्या आगामी निवडणुकांमधे महिलांसाठी ३० टक्के आरक्षण राहील याची खातरजमा करण्याच्या सूचना सर्वोच्च न्यायालयानं बार कौन्सिल ऑफ इंडियाला दिल्या आहेत. यासंदर्भात दाखल झालेल्या याचिकेवर सरन्यायाधीश न्यायमूर्ती सुर्यकांत, आणि न्यायामूर्ती जोयमाला बागची यांच्या पीठापुढं आज सुनावणी झाली. पदाधिकाऱ्यांमधेही महिलांसाठी काही पदं राहतील अशा पद्धतीचे नियम बार कौन्सिल तयार करेल अशी अपेक्षा असल्याचं सरन्यायाधीश म्हणाले.

<><><><><>

मिझोरामचे माजी राज्यपाल, ज्येष्ठ विधीज्ञ आणि दिवंगत केंद्रीय मंत्री सुषमा स्वराज यांचे पती स्वराज कौशल यांच आज निधन झालं. ते ७३ वर्षांचे होते. स्वराज कौशल यांची वयाच्या ३७ व्या वर्षी मिझोरामचे राज्यपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वराज यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

<><><><><>

सध्या तुरुंगात असलेले पाकिस्तानचे माजी प्रधानमंत्री इम्रान खान यांनी येत्या तीन दिवसात आपली वैद्यकीय तपासणी करण्याची परवानगी मागणारी याचिका इस्लामाबाद उच्च न्यायालयात दाखल केली आहे. तेहरीर ए इन्साफ पक्षाचे प्रमुख इम्रान खान यांना सध्या  सध्या रावळपिंडीच्या अदिला कारागृहात ठेवण्यात आलं आहे. इम्रान खान यांच्या प्रकृतीस्वास्थ्याविषयीच्या विविध अफवांची चर्चा सुरू आहे.

//<><><><><>//